**<u>ठळक बातम्या</u>**

- संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झाएद अल नहयान आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यात नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा

- प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी १० हजारांहून अधिक मान्यवरांना आमंत्रण

- भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नबीन यांची निवड निश्चित

**आणि**

- सार्वत्रिक निवडणुका लवकर घेण्यासाठी जपानच्या प्रधानमंत्री सने ताकाईची यांच्याकडून संसदेचं कनिष्ठ सभागृह बरखास्त

**<><><><><>**

भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात संरक्षण, अंतराळ यासह विविध क्षेत्रात भागिदारी करार झाले आहेत. गुजरातमधल्या ढोलेरा इथं संयुक्तरित्या विशेष गुंतवणूक केंद्र स्थापन करण्यावर दोन्ही देशांनी सहमती नोंदवली आहे.

संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झाएद अल नहयान आज संध्याकाळी नवी दिल्लीत पोचले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर प्रधानमंत्री मोदी यांच्या निवासस्थानी त्यांनी द्विपक्षीय चर्चा केली.

अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर नहयान तिसऱ्यांदा भारत दौऱ्यावर आले आहेत.

**<><><><><>**

येत्या २६ जानेवारीला ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीत होणाऱ्या संचलनासाठी दहा हजार विशेष पाहुणे आमंत्रित करण्यात आले आहेत. देशभरातले नवोन्मेषक, बचत गट, तसंच विविध सरकारी उपक्रमांमध्ये विशेष कामगिरी

करणाऱ्यांचा या पाहुण्यांमध्ये समावेश आहे. याशिवाय जागतिक पॅरा ऑलिम्पिक विजेते, नैसर्गिक शेती करणारे शेतकरी, तसेच पीएम स्माईल योजनेतून पुनर्वसन झालेले तृतीयपंथी आणि भिक्षेकरी यांनाही आमंत्रित करण्यात आलं आहे.

नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात सामील होणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या पुरुष अधिकाऱ्यांच्या पथकाचं नेतृत्व यावर्षी महिला अधिकारी सिमरन बाला करणार आहे. जम्मू आणि काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यातून सीआरपीएफ मध्ये निवड झालेली ती पहिली महिला अधिकारी आहे. यावर्षीच्या संचलनात सीआरपीएफ आणि सशस्त्र सीमा बलाच्या महिला अधिकाऱ्यांचं मोटरसायकल पथकही सामील होणार आहे.

**<><><><><>**

विमान कंपन्यांनी प्रवासी भाड्यात सणाच्या दरम्यान अचानक केलेली वाढ म्हणजे प्रवाशांचे शोषण असून त्याबद्दल आपण नक्कीच हस्तक्षेप करणार असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. विमानप्रवासाच्या भाड्यातले अनपेक्षित चढउतार रोखणारे मार्गदर्शक नियम असावेत या  मागणीसाठी केलेल्या जनहित याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या पीठाने सुनावणी घेतली.  गेल्यावर्षी झालेल्या कुंभमेळ्याच्या तसेच इतर सणांच्या काळात  अव्वाच्या सव्वा वाढलेलं विमानभाडं, तसंच सामानाच्या वजनात केलेली कपात, इत्यादी जाचक गोष्टींकडे न्यायमूर्तींनी लक्ष वेधलं, आणि याबद्दल केंद्र सरकार, नागरी वाहतूक महासंचालनालय आणि विमानतळ आर्थिक नियमन प्राधिकरण यांनी उत्तर द्यावे असे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण पक्षचिन्हाबाबतच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात येत्या बुधवारपासून अंतिम सुनावणी सुरू होणार आहे. यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ चिन्हाबाबतही सुनावणी होणार असल्याचं वृत्तसंस्थेच्या

बातमीत म्हटलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालचं खंडपीठ सलग दोन दिवस अंतिम युक्तिवाद ऐकून घेणार आहे. या कालावधीत अन्य कोणतंही प्रकरण न्यायालयाच्या कार्यसूचीत समाविष्ट केलं जाणार नाही, असं न्यायालयानं याआधीच स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

लष्करी अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या मंत्री कुंवर विजय शाह यांच्याविरोधात खटला चालवायला मंजुरी देण्याबाबत दोन आठवड्यात निर्णय घ्यावा असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मध्यप्रदेश सरकारला दिले आहेत. कुंवर विजय शाह यांच्याविरोधात खटला चालवण्याची परवानगी न्यायालयाने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने राज्य सरकारकडे मागितली, मात्र त्यावर सरकारने कोणतीही कार्यवाही केली नाही, याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी  व्यक्त केली. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचं कारण देत राज्य सरकारने समितीला परवानगी नाकारली आहे. कुंवर विजय शाह यांनी माफी मागितली असून ते तपासाल सहकार्य करत असल्याचं वरिष्ठ वकिल मनिंदर सिंग यांनी न्यायालयात सांगितलं. त्यावर त्यांची माफी कुठेही नोंदवलेली नसून आता खूप उशीर झाला आहे, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी म्हटलं.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात दहशतवाद्यांच्या चकमकीत काल जखमी झालेला स्पेशल फोर्सेस चा एक जवान अखेर हुतात्मा झाला आहे. मन्दराल सिंगापोरा भागात काल लष्कराने राबवलेल्या ऑपरेशन त्राशी मध्ये दहशतवाद्यांनी

टाकलेल्या हातबॉम्बच्या स्फोटात आठ जवान जखमी झाले होते. त्यांच्यवर जम्मूच्या लष्करी रुग्णालयात उपचार सुरु होते.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात आज ९ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर शरणागती पत्करली. त्यात ६ महिलांचाही समावेश आहे. या नऊ जणांवर एकूण ४८ लाख रुपयांची बक्षिसं ठेवण्यात आली होती. पोलीस महासंचालकांच्या आवाहनानंतर त्यांनी शरणागती पत्करली असून आज झालेल्या कार्यक्रमात या नक्षलवाद्यांनी त्यांच्याकडील अत्याधुनिक बंदुका आणि इतर शस्त्रं पोलिसांकडे सुपूर्द केली. या नक्षलवाद्यांच्या शरणागतीमुळे आता जिल्ह्यात एकही नक्षलवादी सक्रीय नसल्याची माहितीही पोलीस महासंचालकांनी दिली.

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नबीन यांची निवड निश्चित झाली आहे. भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी अर्ज भरण्याची प्रक्रीया आज नवी दिल्लीत पूर्ण झाली. नितीन नबीन यांच्या नावे ३७ नामांकन अर्ज आले. इतर कोणत्याही उमेदवाराचा अर्ज आलेला नाही असं निवडणूक निर्णय अधिकारी के. लक्ष्मण यांनी जाहीर केलं. नबीन सध्या कार्यकारी अध्यक्ष आहेत.

**<><><><><>**

मुंबईच्या सराफा बाजारात चांदीच्या किंमतीनं आज किलोमागे ३ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला. अवघ्या ५ आठवड्यांमध्ये चांदी किलोमागे १ लाख रुपयांनी महाग झाली आहे. शुक्रवारच्या तुलनेत आज मुंबईच्या बाजारपेठेत चांदी किलोमागे १२ हजार रुपयांनी महाग झाली. त्यामुळं करांसह एक किलो चांदीसाठी सुमारे ३ लाख २ हजार ८०० रुपये मोजावे लागले.

सोनंही तोळ्यामागे सव्वा २ हजार रुपयांनी महाग झालं. त्यामुळं २४ कॅरेट सोन्याचे दर १ लाख ४८ हजार रुपये तोळा आणि २२ कॅरेट सोन्याचे दर १ लाख ४४ हजार रुपये तोळ्यापेक्षा जास्त झाले आहेत.

जागतिक पातळीवर वाढत असलेला तणाव, अतिरीक्त आयात शुल्काची भीती यासारख्या कारणांमुळे देशातल्या शेअर बाजारात आज घसरण झाली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स निर्देशांक आज दिवसअखेर ३२४ अंकांनी घसरला आणि ८३ हजार २४६अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १०९ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार ५८६ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीबद्दलचा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं ७ दशांश टक्क्यांनी वाढवला आहे. चालू आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत सर्व क्षेत्रातली कामगिरी मजबूत होत असल्यानं यंदा आर्थिक वाढीचा दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहील असा अंदाज नाणेनिधीने वर्तवला आहे. पुढच्या आर्थिक वर्षात २०२६-२७ मधे भारताच्या आर्थिक वाढीचा दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील तसंच सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था भारताची असेल, असा अंदाज आज नाणेनिधीने प्रसिद्ध केलेल्या अहवालात दिला आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ३ पूर्णांक ३ दशांश टक्के राहील, आणि अमेरिकेने राबवलेल्या कठोर टॅरिफ धोरणानंतरही अर्थव्यवस्था मजबुतीनं पुढे जात राहील असं अहवालात म्हटलं आहे. अमेरिकन अर्थव्यवस्था २ पूर्णांक ४ दशांश टक्के तर चीनी अर्थव्यवस्था साडेचार टक्के वेगाने वाढत राहील असा अंदाज आहे.

<><><><><>

सार्वत्रिक निवडणुका लवकर घेण्यासाठी जपानच्या प्रधानमंत्री सने ताकाईची यांनी संसदेचं कनिष्ठ सभागृह बरखास्त केलं आहे. संसदेच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी ही घोषणा केली. कनिष्ठ सभागृहात त्यांच्याकडे निसटतं बहुमत आहे आणि वरिष्ठ सभागृहात त्यांच्याकडे बहुमत नाही. त्यामुळं अनेक निर्णय घेताना त्यांना अडचणी येत होत्या. मतदारांकडून पुन्हा जनमत घेण्यासाठी इच्छुक असल्याचं सांगत त्यांनी प्रधानमंत्री पदावर कायम राहण्याची इच्छा व्यक्त केली. गेल्यावर्षी ऑक्टोबरमध्ये जपानच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री म्हणून त्यांनी पदभार स्वीकारला होता. ८ फेब्रुवारीला जपानमध्ये मतदान होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

ग्रीनलँडच्या मुद्द्यांवर आयात शुल्क वाढवण्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेली धमकी चुकीची आहे. व्यापार युद्ध हे कोणाच्याही फायद्याचं नसतं असं ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांनी म्हटलंय. ग्रीनलँड आणि डेनमार्कच्या मूलभूत हक्कांना ब्रिटनचा पाठिंबा आहे आणि युरोप, नाटो आणि अमेरिकेसोबत चर्चा करण्यासाठी तयार असल्याचंही ते म्हणाले. गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी १० टक्के अतिरीक्त आयातशुल्क लादण्याची धमकी दिली होती. त्यासंदर्भात स्टार्मर बोलत होते.

**//<><><><><>//**